(10)

Est. Sept. 1994

2(f) & 12 (B): March 2006

Hanuman Shikshan Prasarak Mandal, Sonpeth's
LATE RAMESH WARPUDKAR ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, SONPETH. DIST. PARBHANI 431516 (MS)
NAAC Accredited with Grade- B
(Affiliated to: Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)
Ph. (02453) 240 142 Fax. (02453)240 142 Principal: 09423 779 000
Web: www.warpudkarcollege.com Email:lrwcsnpt@rediffmail.com./shreyavasant2010@gmail.com

Shri. P.R. Kadam
President

Dr. V.D. Satpute
Principal

Late Ramesh Warpudkar ... Sonpeth ... Parbhani

## Departmental Activity Report

- Name of the Department: Cultural.

1. Name of the Activity: State level online elocution competition in memory of Rajabhau kadam smriti
2. Date: 30 Jan. 2021
3. Place & Time: online mode
4. Objectives of the Programme: To develop students linguistic skill. To provide space for the development of rhetoric. preserving the memory of Rajabhau kadam.
5. Guests/Resource Persons: principal Dr. satpute V.D. president : parmeshwar kadam. kadam S.B.
6. Abstract of the Programme: In this online competition Elake Akshay Maruti, Nikam shubham Madhukar Desai Rituja Ramesh won the first, second and third positions respectively.
7. Total Beneficiaries: 41
8. Achievements/ Outcomes: Student become aware of the qualities required to master the art of rhetoric.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ सोनपेठ संचलित

# कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी

## सांस्कृतिक विभाग

### शैक्षणिक वर्ष : २०२०-२१

| | | |
|---|---|---|
| भाग - अ | | |
| उपक्रम / कार्यक्रमाचे क्रमांक | | 4 |
| उपक्रम / कार्यक्रमाचे नाव | | कै. राजाभाऊ कदम स्मृतीप्रित्यर्थ राज्यस्तरीय ONLINE वक्तृत्व. स्पर्धा |
| दिनांक- | | 30 जानेवारी 2021 |
| उपक्रम / कार्यक्रमाचे स्वरूप | | 20 जानेवारी पर्यंत गुगल फॉर्मच्या माध्यमातून नाव नोंदणी.<br>25 जानेवारी पर्यंत 23 विद्यार्थ्यांच्या भाषणाचे ऑनलाईन व्हिडिओ जमा.<br>30 जानेवारी 2021 रोजी विजेते स्पर्धा जाहीर. |
| उद्देश | १ | विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्याचा विकास करणे |
| | २ | वक्तृत्व कला विकसित होण्यासाठी अवकाश उपलब्ध करून देणे। |
| | ३ | स्पर्धक विद्यार्थ्यांचे भाषण youtube वर चिरंतन स्वरूपात जतन करणे |
| | ४ | संस्थापक अध्यक्ष कै. राजाभाऊ कदम साहेबांच्या स्मृती चिरंतन स्वरूपात जतन करणे. |
| | ५ | प्रत्यक्ष स्पर्धेतून सभाधिटपणा व कार्यक्रमांचे संयोजन विद्यार्थ्यांना शिकवणे |
| प्रमुख पाहुणे / मार्गदर्शक / व्याख्याते | | मा. परमेश्वर कदम |
| उद्घाटक | | प्राचार्य डॉ. वसंत सातपुते |
| ठिकाण | | महाविद्यालयाचा संगणक कक्ष |
| उपस्थिती | विद्यार्थी | 23 |
| | कर्मचारी | 12 |
| | इतर | 06 |
| | एकूण | 41 |

भाग - ब

उपक्रम /. कार्यक्रमाचे क्रमांक संक्षिप्त विवरण

महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाकडून दरवर्षी संस्थापक अध्यक्ष कै. राजाभाऊ कदम साहेबांच्या स्मृतिप्रित्यर्थ राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या शैक्षणिक वर्षात कोरोना महामारी व लॉकडाऊनमुळे या स्पर्धा ONLINE पद्धतीने आयोजित करण्यात आल्या.

या स्पर्धेसाठी 1)नवीन कृषी धोरण - 2020

2) ऑनलाइन शिक्षण: वास्तव आणि भवितव्य

3) कोरोनाचा मानवी जगण्यावरील प्रभाव

असे तीन विषय निश्चित करण्यात आले होते. 20 जानेवारी 2019 पर्यंत गुगल फॉर्मच्या माध्यमातून नाव नोंदणी करून घेण्यात आली. 30 विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी केली. त्यापैकी 23 स्पर्धक विद्यार्थ्यांनी आपले भाषणाचे व्हिडिओ सांस्कृतिक विभागाकडे पाठवले. या स्पर्धा मराठी भाषेतूनच घेण्यात आल्या. या स्पर्धकांचे भाषणाचे व्हिडिओ महाविद्यालयाचे यूट्यूब चैनल वर अपलोड करून त्यांना लिंक शेअर केल्या गेल्या. युट्युब व्हिडिओ लाईक वरून 20% गुण तर 80% गुण परीक्षकांमार्फत देण्यात आले. या स्पर्धेच्या ऑनलाईन आयोजनासाठी IQAC समन्वयक डॉ. मुकुंदराज पाटील व डॉ. संतोष रणखांब यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

या राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. गजानन मुळे (बाराशिव हनुमान कनिष्ठ महाविद्यालय, बाराशिव ता. वसमत जि. हिंगोली), ख्यातनाम वक्ते ॲड.श्री राजाभाऊ कदम (वसमत जि. हिंगोली) व श्री सतीश जाधव (वसमत जि. हिंगोली) यांनी ऑनलाईन भाषणाचे परीक्षण केले. या ऑनलाइन स्पर्धेचा निकाल दिनांक 30 जानेवारी 2021 रोजी जाहीर करण्यात आला. या स्पर्धेतील विजेते विद्यार्थी पुढील प्रमाणे-

| स्पर्धेतील क्रमांक | स्पर्धकाचे नाव | महाविद्यालय / विद्यापीठाचे नाव |
|---|---|---|
| सर्वप्रथम | इळके अक्षय मारुती | नाईट कॉलेज ऑफ आर्ट अँड सायन्स, इचलकरंजी |
| द्वितीय | निकम शुभम मधुकर | मातोश्री केशरबाई काळे अध्यापक महाविद्यालय, लातूर |
| तृतीय | देसाई ऋतुजा रमेश | द न्यू कॉलेज, कोल्हापूर |

विजेत्या स्पर्धकाचे रोख पारितोषिक त्यांच्या बँक खात्यात NEFT द्वारे वर्ग करण्यात आली. या स्पर्धेच्या. पारितोषिकाचे प्रायोजकत्व कार्यालयीन कर्मचारी श्री चोंडे आर.एम., श्री काळे आर. आर. व तळेकर टी.ए. यांनी स्वीकारले होते.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.सखाराम कदम व डॉ. वनिता कुलकर्णी यांनी आयोजक म्हणून भूमिका अदा केली.

उपक्रम /. कार्यक्रमाची उपयुक्तता

Late Ramesh Warpudkar (ACS) College ... Dist. Parbhani

वक्तृत्वाचे रोल मॉडेल म्हणून स्पर्धकांचे भाषण ऐकण्यात पाहण्यात आले.

वक्तृत्व कला अवगत होण्यासाठी कोणते गुण आवश्यक आहेत त्याचीहीं विद्यार्थ्यांमध्ये जागृती झाली.

वक्तृत्व स्पर्धेच्या विषयाची व्याप्ती खोली लक्षात घेऊन सूत्रबद्ध बोलायचा सराव कळाला.

संस्थापक अध्यक्ष कै. राजाभाऊ कदम साहेबांच्या स्मृतींना उजाळा मिळाला.

भाग - क

उपक्रम / कार्यक्रमाचे खर्चाचे विवरण

| अ क्र | खर्च करण्यात आलेल्या वस्तूचे विवरण | झालेला खर्च (रु ) | शेरा |
|---|---|---|---|
| 1) | मोबाईल डाटा रिचार्ज | 120 रू. | |
| 2) | बक्षिसाची रक्कम | 7500 रू. | |
| 3) | परीक्षकाचे मानधन | 1500 रू | |
| एकूण खर्च | | 9120 रू. | |

अहवाल सादर करणारी समिती **सांस्कृतिक विभाग**

| पद | नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| समिती अध्यक्ष/ विभाग प्रमुख | प्रा. सखाराम कदम | |
| समन्वयक | डॉ. वनिता कुलकर्णी | |
| सदस्य | प्रा.डॉ.मुकुंदराज पाटील व प्रा.डॉ.संतोष रणखांब | |

अहवाल सदर केल्याचा दिनांक : ३ फेब्रुवारी २०२१

टीप: सोबत कार्यक्रमाचे GEO TAGGED फोटो व वर्तमानपत्रातील बातम्या जोडाव्यात

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

राज्यस्तरीय ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा :-

महाविद्यालयाकडून दरवर्षी संस्थापक अध्यक्ष कै.राजाभाऊ कदम स्मृतिप्रीत्यर्थ राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यावर्षी कोरोना महामारी व लॉक डाऊन मुळे या स्पर्धा ऑनलाइन पद्धतीने (२०२०-२१ वर्ष तिसरे) संपन्न झाल्या.

या स्पर्धेसाठी 20 जानेवारी 2021 पर्यंत नावनोंदणी गुगल फॉर्म च्या माध्यमातून घेण्यात आली. एकूण 30 स्पर्धकांनी महाराष्ट्राच्या विविध कानाकोपऱ्यातून प्रवेश नोंदवला. या स्पर्धेत केवळ पदवी स्तरावरील तेवीस विद्यार्थ्यांनी आपले भाषणाचे व्हिडिओ पाठवून सहभाग घेतला. स्पर्धा केवळ मराठी भाषेतून घेण्यात आल्या.

स्पर्धकाचे भाषणाचे व्हिडिओ महाविद्यालयाच्या यूट्यूब चैनल वर अपलोड करून त्यांना लिंक शेअर केल्या गेल्या. यूट्यूब व्हिडिओ लाईक वरून 20 टक्के गुण तर 80 टक्के गुण परीक्षकांना मार्फत देण्यात आले. गुगल फॉर्म निर्मिती साठी IQAC समन्वयक डॉ. मुकुंदराज पाटील यांचे तर भाषणाचे व्हिडिओ यूट्यूब चैनल वर अपलोड करण्यासाठी डॉ.संतोष रणखांब यांचे अनमोल सहकार्य लाभले.

या राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. गजानन मुळे, (बाराशिव हनुमान कनिष्ठ महाविद्यालय बाराशिव ता. वसमत जि. हिंगोली), ख्यातनाम वक्ते श्री ऍड.राजा कदम( मु. थोरावा, ता. वसमत जि. हिंगोली) तसेच श्री सतीश जाधव (वसमत जि. हिंगोली) यांनी काम केले. ह्या ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेचा निकाल दिनांक 30 जानेवारी 2021 रोजी जाहीर करण्यात आला. विजेत्या स्पर्धकांचे रोख पारितोषिक रक्कम त्यांच्या बँक खात्यात NEFT द्वारे जमा करण्यात आली. स्पर्धेच्या पारितोषिकाचे प्रायोजकत्व कार्यालयीन कर्मचारी श्री चोंडे आर. एम., श्री काळे आर. आर. व श्री तळेकर टी. ए. यांनी स्वीकारले होते.

विजेत्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे आहेत-

🏆🏅प्रथम पारितोषिक -

इळके अक्षय मारुती - विषय: नवीन कृषी धोरण- 2020 (नाईट कॉलेज ऑफ आर्टस अँड सायन्स, इचलकरंजी)

🏆🏅द्वितीय पारितोषिक -

निकम शुभम मधुकर - विषय: ऑनलाइन शिक्षण वास्तव आणि भवितव्य (मातोश्री केशरबाई काळे अध्यापक महाविद्यालय, लातूर)

🏆🏅तृतीय पारितोषिक -

देसाई ऋतुजा रमेश - विषय: कोरोनाचा मानवी जगण्या वरील प्रभाव (द न्यू कॉलेज, कोल्हापूर)

या सांस्कृतिक विभागाच्या प्रत्येक उपक्रमासाठी सांस्कृतिक विभागातील माझ्या सहकारी डॉ. वनिता कुलकर्णी यांनी वेळोवेळा मदत केली.

प्रा. सखाराम कदम,
सांस्कृतिक विभाग प्रमुख

डॉ. वसंत सातपुते,
प्राचार्य,